
# SCHOLARS IMPACT
Quarterly
International Multidisciplinary Multilingual Journal of Contemporary Research

Vol. 6 | Special Issue 1 | March 2019
ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640
Special Issue
UGC Approved Journal No- 41129
IMPACT FACTOR - 5.98


③



Special Issue on

# MAHATMA GANDHI IN THE CHANGING TIMES

(Book 2)


∴ EDITOR IN CHIEF ∴

DR. M. RAGHIB DESHMUKH

Dr. Ramkishan Bhise
Dr. Digambar Rode
Mr. Hanuman Wankar


MAHATMA GANDHI


Lib
uc

Contents


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | महात्मा गांधी यांचा मूल्यनिष्ठ जनसंवाद | डॉ. राजेंद्र गोणारकर | 6 |
| 2. | महात्मा गांधी आणि भारताचा ग्रामीण विकास : एक अभ्यास | आचार्य व्हि.डी. | 8 |
| 3. | महात्मा गांधी आणि सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार | डॉ. गणेश मोहिते | 11 |
| 4. | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार | डॉ. एस. एन. आकुलवार | 13 |
| 5. | सध्यकालीन प्रश्नांना गांधीवादी विचारांचा पर्याय | डॉ.माधव चोले | 15 |
| 6. | खादी ग्रामोद्योग - एक विचार | भाग्यश्री दाणे | 18 |
| 7. | महात्मा गांधी आणि भारताचे विभाजन यावर वादविवाद | धप्पाधुळे रामेश्वर शं. | 20 |
| 8. | महात्मा गांधीच्या धार्मिक आणि राजकिय विचारांचे संक्षिप्त अवलोकन | डॉ. ढोले चंद्रशेखर शं. | 22 |
| 9. | महात्मा गांधी यांच्या विचारांचा मराठी साहित्यावर प्रभाव | डॉ. डिगोळे बालाजी वि. | 24 |
| 10. | भारतीय खेडी या संदर्भात महात्मा गांधीचा वैचारिक दृष्टीकोन | डॉ.भगवान डोंगरे | 28 |
| 11. | गांधी प्रणित शिक्षण प्रणाली : एक दृष्टिक्षेप | कु.फुलारी ज्योती महिशंकर | 31 |
| 12. | ग्रामीण विकासातील महात्मा गांधीचे योगदान | गाडवे मनिषा महारूद्र | 33 |
| 13. | महात्मा गांधी यांचे भारतीय लोकशाहीतील योगदान | डॉ.एल.डी.गलंडे | 35 |
| 14. | महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासातील महत्त्वपूर्ण योगदान | डॉ. यादव घोडके | 37 |
| 15. | महात्मा गांधीजीचे सत्याग्रह विषयक विचार | लक्ष्मण मा. घोटेकर | 40 |
| 16. | पांढरे ढग आणि उल्का या कादंबऱ्यावर गांधीवादाचा प्रभाव | डॉ.आशा सोपानराव गिरी | 42 |
| 17. | महात्मा गांधीजींची साध्य साधन सुचिता | डॉ. सखाराम य. गेरे | 44 |
| 18. | महात्मा गांधी: सत्याग्रह एक प्रभावी साधन प्रा.विक्रम ल.खेडकर | डॉ.अनिल पां.हजारे | 46 |
| 19. | ग्रामीण विकासाचे शिल्पकार महात्मा गांधी | डॉ. इरलापल्ले पल्लवी भा. | 49 |
| 20. | ग्रामीण विकासाबाबत महात्मा गांधींचा दृष्टीकोन | सौ.प्रियंका वि. जाधव (आवते) | 51 |
| 21. | गांधीवादातील निवडक पैलूचे अध्ययन | सुरेश लोभाजी जाधव | 53 |
| 22. | जागतिकीकरण, महात्मा गांधी आणि काही प्रश्न | डॉ. मारोती तेगमपुरे | 56 |
| 23. | महात्मा गांधींचे भाषाविषयक कार्य | डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्रे | 59 |
| 24. | राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | डॉ. संतोष तुकाराम कदम | 61 |
| 25. | भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि महात्मा गांधी यांचे विचार | रमेश तारकराम खंडागळे | 65 |
| 26. | इंग्रज आणि भारतीय भाशेतील साहित्यावर महात्मा गांधीजींचा प्रभाव | प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव | 68 |
| 27. | ग्रामीण विकासासाठी महात्मा गांधीजीचा –दृष्टीकोन | डॉ.लोंखडे बी.बी. | 70 |
| 28. | मराठी कवितेवर गांधीवादाचा प्रभाव | डॉ. अशोक गौरीशंकर माळगे | 72 |
| 29. | गांधीजींचे उद्योग आणि व्यापार विषयक विचार | डॉ. माळी चंद्रकांत बन्सी | 74 |
| 30. | महिला सक्षमीकरणातील गांधीजींची भूमिका | डॉ. पी. व्ही. माने | 77 |
| 31. | महात्मा गांधीजींचे महिला सशक्तीकरण बद्दलचे विचार | डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे | 79 |

3.

# महात्मा गांधी आणि सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार

डॉ. गणेश मोहिते
सहा. प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
बलभीम महाविद्यालय, बीड. - ४३११२२.

**प्रस्तावना :** :-भारतीय इतिहासात महात्मा गांधी हे एक असामान्य असे व्यक्तिमत्व होऊन गेलेले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात गांधीजीचे कार्य मोलाचे आहे, त्यांनी आपल्या आचरणातून, विचारांमधून सामान्य जनतेमध्ये सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केलेले आहे. गांधीजींना सामान्य जनतेविषयी विशेषतः गरीबांविषयी नेहमीच कळवळ असलेली दिसून येते. गांधीजींच्या विचारांमध्ये गरीब व शोषित जनता नेहमीच केंद्रस्थानी होती. गरीबांशी ते एकरुप झालेले दिसून येतात. त्यामुळेच त्यांनी गरीबांसारखाच वेष धारण केलेला दिसून येतो. आधुनिक भारतीय आर्थिक विचारसरणीत मोहनदास करमचंद गांधी यांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. हे गांधीचे टिकाकार मान्य करतात ते प्रामुख्याने अध्यात्मवादी व मानवतावादी विचारवंत म्हणुन ओळखले जातात. धर्म आणि राजकारण यांचा सुंदर समन्वय साधुन त्यांनी राजकारणाला व्यवहारिक अशी नवी अध्यात्मवादी दृष्टि दिली. मानवता हा त्यांचा केंद्रबिंदु असुन मानव मुळातच चांगला असतो यावर त्यांची नितांत श्रध्दा होती साध्य आणि साधन सुचिता हा त्यांच्या विचारांचा गाभा असुन अन्यायाचा प्रतिकार सत्य अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने करता येतो हे त्यांनी आपल्या विचारतून व कृतीतुन दाखवून दिले. बलाढय साम्राज्य शक्तीचा प्रतिकार अहिंसेच्या मार्गाने करता यतो हे त्यांनी जगाला दखवुन दिले त्यामुळे त्यांचे एकुणच विचार 'गांधीवादी' या नावाने ओळखले जाऊ लागले. गांधीवाद एक प्रखर तत्वज्ञान बनल्यामुळे त्यांची आवश्यकता संपूर्ण जगाला भासू लागली आहे.

महात्मा गांधीजीचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचार आजच्या युगात अतिशय उपयुक्त आहेत ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

**महात्मा गांधीजीचे सामाजिक विचार :** जाती व्यवस्था ही हिंदुस्थानाची मुलभूत सामाजिक समस्या आहे यासंबंधी गांधीजीनी १९२१-२२ च्या नवजीवन या गुजराती सप्ताहिकातुन विस्ताराने चर्चा केली आहे. जो लेख गुजराती भाषेतुन लिहिला गेला हा लेख गांधी शिक्षण या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात पुर्नग्रहण करण्यात आला . त्यातील काही भाग सामाजिक रचनेसाठी उपयुक्त आहे.

१) हिंदु समाज जिवंत आहे याला कारण हिंदु समाजाचा आधार जातीव्यवस्था आहे हे होय असा माझा विश्वास आहे.
२) स्वराज्याची बिजे जाती व्यवस्थेत शोधवी लागतील वेगवेगळया जाती या सेवेसाठी स्थापन केलेल्या वेगवेगळया विभागासारख्या आहेत.
३) जाती व्यवस्था हे नियंत्रण व्यवस्थेचे दुसरे नाव आहे जात ही विलासी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवते.
४) जाती व्यवस्था नष्ट करून युरोपची पाश्चिमात्य सामाजिक व्यवस्था स्वीकारणे याचा अर्थ हिंदूनी आपली [illegible] पिढ्या वंशपरंपरागत चालत आलेली रोजगाराच्या व्यवसायाची [illegible] विकेंद्रीकरणाची व्यवस्था त्यागणे असाच होईल हे [illegible] बदलने म्हणजे अव्यवस्था निर्माण करणे होय.
५) जाती व्यवस्था ही समाजाची स्वाभाविक व्यवस्था आहे. हिंदुस्थानात या व्यवस्थेला धर्माचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे इतर देशांना जाती व्यवस्थेची उपयोगिता समजलेली नाही त्यामुळे त्या देशात ही व्यवस्था सैल स्वरूपात अस्तित्वात आहे. म्हणून जाती व्यवस्थेचे जे लाभ हिंदुस्थानला मिळाले त्या लाभापासून हे देश वंचित आहेत. हे माझे जातीव्यवस्थेसंबंधी विचार आहेत.

खेड्यातील लोक वर्णव्यवस्थेच्याद्वारा आपला अंतर्गत कारभार सांभाळीत आणि वर्णव्यवस्थेमार्फत एक किंवा अनेक राजसत्तांच्याकडून होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या जुलुमाला तोंड असते ते राष्ट्र अशा रितीने वर्णपध्दतीतून आपली [illegible] संघटनशक्ती उत्पन्न करायला समर्थ होऊ शकत होते. त्या राष्ट्रात समाज व्यवस्था करण्याचे सामर्थ्य नव्हते असे कदापी म्हणता येणार नाही.

**महात्मा गांधीचे आर्थिक विचार :** हिंदुस्थानातील सामाजिक रजनेबाबत गांधीजीचे विचार पाहिल्यानंतर त्यांचे आर्थिक प्रश्नासंबंधी विचार पाहु. म.गांधी यांचे आर्थिक विचार हे सत्य, अहिंसा, श्रम आणि प्रतिष्ठा व साधेपणा या तत्वावर आधारित आहेत त्यांच्या मते अर्थशास्त्र आणि नितीशास्त्र यांना परस्परापासून वेगळे करण्याचे कारण नाही किमान गरजा आणि साधी राहणी गृहीत धरून त्यांनी आपले आर्थिक विचार मांडले मनुष्याने आपल्या गरजा मर्यादित केल्या. राहणी साधी ठेवली तर मनुष्याला सुख आणि समाधान प्राप्त होईल असे गांधीजींना वाटत होते म.गांधीनी मांडलेले काही आर्थिक विचार पुढील प्रमाणे -

**महात्मा गांधीचे राजकीय विचार :** महात्मा गांधीच्या विचारांचा वेध घेतांना त्यांचे राजकीय तत्वज्ञान व प्रत्यक्ष कार्य या दृष्टीने त्यांच्या राजकीय विचारांचे पैलु अभ्यासणे योग्य ठरते. गांधीवाद, धार्मिक मानवतावाद, सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सत्याग्रहाचे मार्ग, विधायक कार्यक्रम, ग्राम राज्याची कल्पना, विश्वस्तवृत्ती, स्वराज्य, आंदोलन, धर्म, राजकारण आणि साम्यवाद इत्यादी गांधीजींचा अभ्यास राजकीय विचारात होतो.

**साध्य- साधन संबंध :** राजकारणात साधनांच्या शुध्दतेचा विचार कोणी करीत नाही. विचार होतो तो यशा-पयशाचा, विजयाचा गौरव करण्याची परंपरा जुनीच आहे. राज्यकर्त्यांने फक्त विजयाचा विचार करावा त्यासाठी कोणताही मार्ग अवलंबिला तरी चालेल. निती अनीतीचा त्याने विचार करू नये,असा स्पष्ट इशारा प्रबोधनकालीन इटालियन विचारवंत मेकॅव्होलीने दिला होता.

**राजकीय सत्तेचे विकेंद्रिकरण :** राजकीय सत्तेसाठी पंचायत राजची आदर्श व्यवस्था ठेवली होती. यात लोकांनी लोकाद्वारे निवडलेले शासन ग्रामीण शासनात म. गांधीना अभिप्रेत होते. ग्रामसभेच्या माध्यमातुन सार्वजनिक तलाव, विहीर , व्यवसाय आणावेत. त्याचा न्याय निवाडा गावतच व्हावा असे त्यांचे मत होत. ग्रामसभेतून जी सार्वजनिक कामे रस्ते, लघु सिंचन तलाव, आरोग्य या सर्व समस्या गावातूनच पुर्ण व्हाव्यात म्हणून त्यांनी ग्रामीण विकासाकरता राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण केले.

**समारोप :** गांधीजींचे विचार केवळ राजकिय, आर्थीक, सामाजिक क्षेत्रापुरते मर्यादीत नाही तर त्यांनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या समग्र जीवनाचा विचार केलेला आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रश्नांवर विचार करून उपाय सूचविले आहेत. गांधीजी हे आर्थीक आणि धार्मिक असल्यागुळे व्यक्तीच्या समग्र जीवनानाला त्यांनी अध्यात्मिक अधिष्ठान दिले. गांधी विचारातून पंचायत राजसंबंधी विचार स्विकारण्यात आले. त्यांचे राजकीय अध्यात्मिकरणाचे तत्त्व जर स्विकारले तर राजकारणात क्रांतीकारी परिवर्तन होऊ शकते. मात्र गांधीजीचे विचारानुसार आपण बदल न करू शकल्याने ग्रामीण जीवनात आर्थिक, सामाजिक ,राजकिय व शैक्षणिक तत्सम समस्या दिसुन येतात.

**संदर्भ :**


१. आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा.प.आर. रायखेलकर
२. भारतीय राजकीय व्यवस्थेचा अकृतिबंध खंड १ तुकाराम जाधव व महेश शिरपूरकर
३. गांधी विचारदर्शन - ग्रामस्वराज्य
४. गांधी चिारदर्शन - अर्थकारण
५. भारतीय राजकीय विचारवंत - डॉ. अ.रा.शिंदे. डॉ. रेखा परळीकर
६. राजनिती - चिंतन की रूपरेखा - ओमप्रकाश गावा
७. राजनिती विज्ञान - अशोककुमार


□□□